नि. दि. दा. क्र.२५२/२०२१
(कुसूम जाधव वि. लक्ष्मण जाधव)

## निशाणी क्र. ११ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने दाव्यात दुरुस्ती होण्यासाठी दाखल केला आहे. वादीने प्रस्तुत अर्जाच्या समर्थनार्थ निशाणी क्र. १२ कडे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

०२) अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, वादीच्या दाव्यातील वंशावळमध्ये टायपिंग चुकीमुळे चुक झाली आहे. त्यामुळे अर्जातील नमुद वंशावळ लिहिणे आवश्यक आहे. त्यामुळे वादीने दावा दुरुस्त करुन मागितला आहे. तसेच प्रतिवादी नं. १६ च्या नावामध्ये दुरुस्ती करुन मागितली आहे. प्रतिवादीतर्फे म्हणणे दाखल न केल्याने अर्ज विना म्हणणे चालविण्यात येत आहे.

०३) वादीतर्फे वकील श्री. देशपांडे यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादीतर्फे वकील व प्रतिवादी गैरहजर राहिल्याने अर्ज युक्तीवादाविना आदेशाकरिता नेमण्यात आला.

०४) अर्ज, दावा व अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जात मागितलेली दुरुस्ती करण्यास कोणतीही अडचण नाही किंवा त्यामुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होत नाही. तसेच प्रतिवादी नं. १६ यांच्या नावात बदल करणे दाव्याचा अंतिमरित्या फैसला होण्यासाठी आवश्यक असल्याचे दिसून येते. दुरुस्ती मंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होत नाही. उलट दाव्याचा निकाल गुणगुणांवर होणेस मदत होणार आहे. त्यामुळे सदरची दुरुस्ती होणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. करिता मी खालील आदेश पारित करतो.

## आदेश

०१) अर्ज मंजुर करण्यात येतो.

०२) वादीने दाव्याच्या सरनाम्यात व दाव्यात अर्जात मागणी केल्याप्रमाणे दुरुस्ती करावी.

०३) वादीने प्रस्तुत आदेशापासून १४ दिवसांच्या आत अर्जामध्ये नमूद दुरुस्ती करून दुरुस्ती दाव्याची प्रत सादर करावी.

०४) खर्चाबाबत आदेश नाही.

( एम. आर. कामत )

दिनांकः–२३/११/२०२२. ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पंढरपूर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this PDF file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment / Order.

| | | |
|---|---|---|
| Court | : | 3rd Jt. C. J. J. D. & J. M. F. C. Pandharpur |
| Name of Stenographer | : | S. M. Shaikh. |
| Date | : | 23/11/2022. |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 23/11/2022. |
| Judgment/Order uploaded on | : | 23/11/2022. |